# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः20.05.2025** **वारःमंगळवार**

---

1. प्रवासी भारतीयांसाठीच्या ओवरसीझ सिटीझन ऑफ इंडिया ओसीआय संकेतस्थळाचं उद्घाटन
2. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचा आज महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळात समावेश होणार
3. रशिया-युक्रेन युध्दबंदीसाठी चर्चेला तयार असल्याची अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांची माहिती आणि
4. दीवमधल्या घोघला किनाऱ्यावर पहिल्या खेलो इंडिया किनारी क्रीडा स्पर्धेचं उद्घाटन

**अमित शहा पोर्टल**

प्रवासी भारतीयांसाठीच्या ओवरसीझ सिटीझन ऑफ इंडिया म्हणजेच ओसीआय या संकेतस्थळाचं उद्घाटन काल केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्या हस्ते करण्यात आलं. या पोर्टलमुळे 50 लाखांहून अधिक प्रवासी भारतीयांना विविध सुविधा एका संकेतस्थळावर सहज उपलब्ध होणार आहे. अनिवासी भारतीय आणि देशपरदेशात प्रवास करणाऱ्या भारतीय नागरिकांसाठी अधिक कार्यक्षमतेनं काम करणाऱ्या पोर्टलचं पंतप्रधानांनी समाजमाध्यमावर कौतुक केलं आहे.

**कृषी संकल्प अभियान**

शेतकऱ्यांना कृषीविषयक आधुनिक तंत्रज्ञान आणि बियाण्यांची माहिती देण्यासाठी येत्या 29 मे पासून देशव्यापी विकसित कृषी संकल्प अभियान सुरू करण्यात येणार आहे. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. देशातल्या 723 जिल्ह्यांमधे ही मोहीम राबवण्यात येणार असून, सुमारे दीड कोटी शेतकऱ्यांपर्यंत ही माहिती पोहोचवण्याचं उद्दिष्ट आहे. एकंदर 65 हजार गावात जाऊन वैज्ञानिकांचं पथक शेतकऱ्यांना यासंदर्भात प्रात्यक्षिकं आणि प्रशिक्षण देईल. जिल्हा पातळीवर या पथकाच्या दररोज तीन बैठका होतील असं त्यांनी सांगितलं. या अभियानात 2 हजार 170 पथकं तयार करण्यात येणार असून प्रत्येक पथकात किमान 4 शास्त्रज्ञांचा समावेश असेल.

**कृषी परिषद**

देशभरातील कृषी विद्यापीठ आणि कृषी संशोधन संस्थेचे कुलगुरू आणि संचालकांची वार्षिक बैठक आज नवी दिल्लीत होत आहे. केंद्रिय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान यांच्या हस्ते या परिषदेचं उद्घाटन होणार आहे. कृषी क्षेत्रातील संशोधन, शिक्षण आणि 2047 मधील विकसित भारत अशी या परिषदेची मध्यवर्ती संकल्पना आहे. परिषदेत कृषी क्षेत्रातील प्रमुख धोरणकर्ते, विचारवंत आणि शैक्षणिक तज्ञ एकत्र येतील आणि देशभरातील शेती क्षेत्रात नवसंकल्पना राबवून नवोपक्रम परिसंस्थेला बळकटी देण्यासाठी आवश्यक असलेल्या धोरणात्मक सुधारणांवर चर्चा केली जाईल.अशी माहिती कृषी मंत्रालयाने एका निवेदनात दिली आहेय

**लष्करप्रमुख**

लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी काल राजस्थानमधील लोंगेवाला इथं भेट दिली आणि या भागात तैनात असलेल्या सैनिकांशी त्यांनी संवाद साधला. ऑपरेशन सिंदूर दरम्यान सैन्यदलानी केलेल्या पराक्रमाबद्दल लष्करप्रमुखांनी सैनिकांचे अभिनंदन केलं. या भागात भारतीय हवाई दल आणि सीमा सुरक्षा दलाच्या समन्वयाने केलेल्या संयुक्त कारवाईचाही लष्करप्रमुखांनी आढावा घेतला.

**<u>जीईएम</u>**

केंद्र सरकारची ऑनलाईन विपणन सुविधा अर्थात जीईएम हे ई-मार्केट जगभरात सर्वात मोठी, कार्यक्षम आणि परवडणारी बाजारपेठ ठरली असल्याचं जीईएमचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिहीर कुमार यांनी काल ऑनलाईन सुविधेच्या 8 व्या स्थापना दिनानिमित्त नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत सांगितलं. GeM ने 10 लाखांहून अधिक सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग, एक लाखापेक्षा अधिक कारागीर आणि विणकर, 1 लाख 80 हजाराहून अधिक महिला उद्योजक आणि 31 हजार स्टार्टअप्सना या सेवेत सामावून घेतलं आहे. केवळ 8 वर्षांत, GeM सार्वजनिक स्तरावर खरेदीसाठी एक परिवर्तनकारी शक्ती म्हणून उदयास आले आहे. बाजापेठेचं आकारमान आणि बाजारमूल्य दोन्ही बाबतीत अभूतपूर्व यश मिळवलं असून एक मजबूत डिजिटल परिसंस्था म्हणून विकसित झालं आहे. असंही मिहीर कुमार म्हणाले.

**<u>मिस्त्री</u>**

भारत पाकिस्तान दरम्यान सध्याच्या परराष्ट्र धोरणाबाबत परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी काल काँग्रेसचे खासदार शशी थरुर यांच्या अध्यक्षतेखालील समितीला माहिती दिली. ऑपरेशन सिंदूर आणि त्यानंतर घडलेल्या घटनांबाबत यावेळी सविस्तर चर्चा झाली. संसदीय समितीसमवेत झालेल्या बैठकीनंतर थरुर यांनी यासंबंधीची माहिती वार्ताहर परिषदेत दिली. परराष्ट्र धोरण विकासाविषयी संसदीय स्थायी समितीला वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यानं माहिती देण्याची ही पहिलीच वेळ असल्याचंही थरुर यांनी नमूद केलं.

**<u>उपराष्ट्रपती-गोवा</u>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आजपासून तीन दिवसांच्या गोवा दौऱ्यावर जात आहेत. या भेटी दरम्यान, उद्या ते मोरमुगाव बंदरावर उभारण्यात आलेल्या प्रकल्पांचं राष्ट्रार्पण करतील. तसंच बंदरावरील वरिष्ठ अधिकारी, कर्मचाऱ्यांशी संवाद साधतील. गुरुवारी, उपराष्ट्रपती कृषी संशोधन केंद्राला भेट देतील. तसंच राज भवन इथं उभारण्यात आलेल्या आयुर्वेदतज्ज्ञ चरक आणि सुश्रुत यांच्या पुतळ्यांचं अनावरण करणार आहेत.

**<u>डॉ. एस. जयशंकर</u>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी नेदरलँड्समधील हेग इथं डच परराष्ट्र मंत्री कॅस्पर वेल्डकॅम्प यांची काल भेट घेतली. दोन्ही देशांची द्विपक्षीय भागीदारी आणि युरोपियन संघाशी असलेले संबंध दृढ करण्यासंदर्भात यावेळी व्यापक चर्चा झाली. असं त्यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. पहलगाम हल्ल्याचा नेदरलँडनं तीव्र निषेध केला आहे. दहशतवादाविरुद्ध केलेल्या कारवाईला दिलेल्या समर्थनाबद्दल त्यांनी नेदरलँडसचं कौतुक केलं.

**<u>छगन भुजबळ</u>**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचा महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळात समावेश होणार आहे. आज सकाळी त्यांचा शपथविधी होईल. त्यांना अन्न आणि नागरी पुरवठा खात्याचं मंत्रिपद मिळण्याची शक्यता असल्याचं या संदर्भातील वृत्तात म्हटलं आहे.

**<u>ट्रंप</u>**

रशिया आणि युक्रेनदरम्यान लवकरच युध्दविरामासंदर्भात थेट चर्चा होईल आणि युध्द संपेल असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी समाजामाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. रशियाचे राष्ट्राध्याक्ष व्लादिमिर पुतीन यांच्या बरोबर दुरध्वनीद्वारे झालेल्या चर्चेनंतर दोनही देश चर्चेला तयार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनीही आपण युक्रेनसोबत संभाव्य शांतता करारावर काम करण्यास तयार असल्याचं म्हटलं आहे. रशियानं बिनशर्त युद्धबंदी करावी असं आवाहन युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी निवेदनाद्वारे केलं आहे. युक्रेन रशियासोबत तुर्की, स्वित्झर्लंड किंवा व्हॅटिकनमध्ये शांतता चर्चा

करण्यास तयार आहे. असंही त्यांनी नमूद केलं आहे. तुर्कीएतील इस्तंबूल इथं नुकतीच झालेली चर्चा अयशस्वी झाल्यानंतर पुढच्या टप्प्यात शांततेसाठी नव्याने प्रयत्न केले जात आहेत.

**व्हिसा**

अमेरिकेने विविध पर्यटन कंपन्या, त्यांचे मालक आणि अमेरिकेत बेकायदा स्थलांतरितांना मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध व्हिसा निर्बंध जाहीर केले आहेत. अशा व्यक्तिंविरोधात कठोर कारवाई करण्याच येईल असं अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाच्या प्रवक्त्या टॅमी ब्रूस यांनी जारी केलेल्या निवेदनात देण्यात आली आहे. असे निर्बंध लागू करण्यात आलेल्या नागरिकांची आणि संस्थांची संख्या किती आहे याबाबत मात्र कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. भारतीय दुतावास आणि दोनही देशांच्या संरक्षण संस्था अनधिकृत स्थालांतर टाळण्यासाठी काम करत आहे. असंही त्या म्हणाल्या.

**खेलो इंडिया बीच गेम्स**

पहिल्या खेलो इंडिया किनारी क्रीडा स्पर्धाचं उद्घाटन काल संध्याकाळी केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांच्या हस्ते करण्यात आलं. दीवमधल्या घोघला किनाऱ्यावर झालेल्या नेत्रदीपक उद्घाटन सोहळ्यात पारंपरिक नृत्यप्रकारांचे सादरीकरण झालं. येत्या 2047 पर्यंत भारत क्रीडा क्षेत्रातली महासत्ता होण्यास कटिबद्ध असल्याचं मांडवीय उद्घाटनावेळी बोलताना म्हणाले. खेलो इंडिया बीज गेम्स हा देशाच्या क्रीडा इतिहासातील एक महत्त्वाचा क्षण असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

**टेबल टेनिस विश्वकरंडक**

कतारमध्ये सुरु असलेल्या जागतिक टेबल टेनिस विश्वविजेतेपद स्पर्धेत भारताच्या दिया चितळे आणि यशस्विनी घोरपडे यांनी महिला दुहेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. त्यांनी सिंगापूरच्या जोडीचा पराभव केला. पुढील फेरीत त्यांचा सामना जागतिक क्रमवारीत सहाव्या क्रमांकावर असलेल्या जपानी जोडीशी होणार आहे. तर अहिका मुखर्जी आणि सुतीर्थ मुखर्जी यांना पराभव पत्करावा लागला.

**आपपीएल**

आपपीएल क्रिकेट स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात लखनौ सुपर जायंटस संघ प्लेऑफ्सच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. सनरायझर्स हैद्राबाद संघानं कालच्या सामन्यात लखनौ संघावर सहा गडी राखून विजय मिळवला. 206 धावांच्या लक्ष सनरायझर्स हैदराबादने 18 षटकं 2 चेंडूत चार गडी गमावून पार केलं. अभिषेक शर्माला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. लखनौ सुपर जायंट्सकडून दिग्वेश सिंग राठीने दोन बळी घेतले, तर विल्यम ओरोर्क आणि शार्दुल ठाकूर यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. तत्पूर्वी, सनरायझर्स हैदराबादने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. आज चेन्नई सुपर किंग्ज संघाचा सामना राजस्थआन रॉयल्सबरोबर होणार आहे.

**हवामान**

कर्नाटकमध्ये येत्या दोन दिवसांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं जारी केला आहे. त्यासह तामिळनाडू, कोकण, गोवा आणि महाराष्ट्रात पुढील तीन दिवस अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. उद्यापासून मुंबईतही मध्यम ते मुसळधार पाऊस होणार असल्याची माहिती हवामान विभागाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ आर. के जेनामानी यांनी दिली आहे. देशातल्या उत्तर भागात उष्णतेची लाट तीव्र होण्याची शक्यता नसल्याचंही ते म्हणाले.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.